# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक ४ मार्च, २०२१

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक** : **प्रश्नोत्तरे.**

**दोन** : **कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री** : "विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये जलसंपदा विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **महसूल मंत्री** : "विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये महसूल व वन विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** : "विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र" सभागृहासमोर ठेवतील.

(४) **ऊर्जा मंत्री** :

**(क)** "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा चौदावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक

अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(५) **परिवहन मंत्री** : (क) "कोंकण रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ख) "महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास महामंडळ लिमिटेड यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.**

**चार : राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेवर उत्तर.**

**पाच : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**सहा : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास).**

## - मध्यंतर -

**सात : उप मुख्यमंत्री यांचा प्रस्ताव :-**

"महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम २८९ अन्वये पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या संदर्भात, विधानपरिषद नियमांतील नियम २३०(२) मधील तीन दिवसांच्या कालावधीची जी तरतूद आहे ती स्थगित करण्यात यावी"

**आठ : सन २०२०-२०२१ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा — (पहिला व शेवटचा दिवस)**

**खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.**

१. मुख्यमंत्री.

२. उप मुख्यमंत्री.

३. सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री.

४. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री.

५. जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री.

६. गृहमंत्री.

७. महसूल मंत्री.

८. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री.

९. अल्पसंख्यांक विकास व औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री.

१०. ग्रामविकास मंत्री.

११. ऊर्जा मंत्री.

१२. शालेय शिक्षण मंत्री.

१३. नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री.

१४. पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री.

१५. इतर मागास बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री.

१६. वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री.

१७. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री.

१८. कृषि, माजी सैनिक कल्याण मंत्री.

१९. आदिवासी विकास मंत्री.

२०. परिवहन, संसदीय कार्य मंत्री.

२१. वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री.

२२. महिला व बालविकास मंत्री.

२३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री.

**नऊ : शासकीय विधेयके —**

**(१) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विधेयक विचारात घेणे -**

"सन २०२१ चे वि.स.वि. क्रमांक १ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२१"

**(२) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

"सन २०२१ चे वि.स.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, २०२१"

**(३) विधानसभेने संमत केल्यास - विधेयक विचारात घेणे -**

"सन २०२१ चे वि.स.वि. क्रमांक ३ — महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२१"

-------------------------------------------------------------------------

दहा : **सर्वश्री प्रविण दरेकर,** विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री विनायक मेटे, सदाशिव खोत, महादेव जानकर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, हत्या, अपहरण, दरोडे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात झालेली वाढ, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, पुणे येथे पुजा चव्हाण आत्महत्या प्रकरणी संशयित मंत्र्यांचा राजीनामा घेतला असला तरी तो राज्यपालांकडे पाठविलेला नसल्यामुळे जनतेच्या मनात निर्माण झालेला संभ्रम, या प्रकरणी २४ दिवसांचा कालावधी होऊनही गुन्हा दाखल झालेला नसून तपासाबाबत राज्यातील जनतेला अंधारात ठेवले असणे, पारदर्शक पध्दतीने तपास होण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेकडे तपास देण्याची आवश्यकता, ज्येष्ठ नागरिकांसंबंधीच्या गुन्ह्यात झालेली वाढ, डान्सबारला आळा घालण्यात आलेले अपयश, सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, पोलिसांवर पडणारा ताण, पुणे, नागपूर, नाशिक या सारख्या शहरात संघटित गुन्हेगारीत झालेली वाढ, वाळूमाफियांकडून, अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांकडून शासकीय अधिकाऱ्यांवर होणारे हल्ले व जीवे मारण्याच्या धमक्या, करोना काळात पोलिसांवर झालेले हल्ले, सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्यांना मिळालेले मोकळे रान, सामाजिक अत्याचारात झालेली वाढ, महान कलाकारांची गुप्तहेरांमार्फत चौकशी करण्याचा सरकारने घेतलेला घृणास्पद निर्णय, गुंडाराजचं होत असलेले उदात्तीकरण, राज्यावर घातपाती कारवायांचं असलेलं गंभीर सावट, जातीय हिंसाचारात झालेली वाढ, जातपंचायतीच्या अत्याचाराच्या समोर आलेल्या घटना, तसेच, मुंबईतील अनेक मोठ्या व जनउपयोगी प्रकल्पांचे रखडलेले काम, वाहतुकीचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचार व अनियमिततेची प्रकरणे, पुनर्विकास प्रकल्पांची रखडलेली कामे, मुंबईच्या विविध समस्यांनी धारण केलेले उग्र स्वरुप, मुंबईतील रखडलेली विकास कामे, महानगरपालिकेने गेल्या १० वर्षात केलेला खर्च, याबाबत श्वेतपत्रिका जाहीर करण्याची होत असलेली मागणी, तसेच, करोना प्रादुर्भाव व मृत्युची संख्या देशपातळीवर महाराष्ट्रात सर्वाधिक, करोना उपाययोजनेत झालेला भ्रष्टाचार, टाळेबंदीमुळे अडचणीत आलेल्यांना सरकारने पॅकेजेस देण्यात केलेली कुचराई, सत्तारुढ पक्षाच्या नेत्यांकडून करोना नियमांचे झालेले उल्लंघन, करोना हाताळण्यात सरकारला आलेले अपयश, तसेच राज्यातील विविध विभागांचा संतुलित विकास

करण्यात व टाळेबंदी शिथिलीकरणानंतर या विभागांचे अर्थचक्र सुरळीत करण्यात सरकारला आलेले अपयश, राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, मराठा, धनगर, आर्थिकदृष्टया मागास यांच्यासाठीच्या योजना राबवण्यात, त्याचा लाभ देण्यात सरकारला आलेले अपयश, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ३ मार्च, २०२१.

**राजेन्द्र भागवत**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद